माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों. क्र. २००५८५/२०/अ. क्र. ५८४/२३/०१

**श्री. किसन ना.जाधव**
मुंबई जनसत्ता, साप्तहिक,६/३९०,
करदोडी इमारत, ना.म. जोशी मार्ग,
मुंबई ४०० ०११.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.२) जी/दक्षिण विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
१ ला मजला, धनमिल कंपाऊंड, एन.एम. जोशी मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अधिकारी जी/दक्षिण विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
१ ला मजला, धनमिल कंपाऊंड, एन.एम. जोशी मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१३.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.०६.२०२३**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०८.२०१८ | ०६.०९.२०१९ | १८.११.२०१९ | २१.१२.२०१९ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०१.०२.२०२० रोजीच्या अर्जान्वये खालील कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे:-

"सदर अर्जाची कागदपत्रे निरीक्षण देण्याचे आदेश प्रथम अपीलधारकांनी दि. २३.१२.२०१३ दिले. त्यानुसार मी त्या दिवशी उपस्थित होतो. तरी मला कागदपत्रे दाखविण्यात आले नाही. मोबाईलवर संपर्क केला तरी माहिती देतो अशी आश्वासने देऊन टाळाटाळ करतात."

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. २३.०८.२०१८ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

"मंडई शांताबाई हुले दुरुस्ती कामाचे कंत्राट – वर्क ऑर्डर, स्केच, बिल प्रत, बक गॅरन्टी इ. कागदपत्रे."

अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०६.०९.२०१९ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २१.१२.२०१९ संलग्न केलेले आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. ०६.०९.२०१९ अन्वये अपिलार्थींना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे:-

"आपणास हवी असलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची उपलब्ध असून आपण १ महिन्याच्या आत कोणत्याही कामकाजाच्या दिवशी (सोमवार) दु. ३.०० ते ५.०० या वेळेत प्रत्यक्ष पाहणी करुन प्रति प्रत रु. २/- (रुपये दोन मात्र) शुल्क या विभागात भरणा केल्यानंतर देण्यात येईल."

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे शेरे नोंदवून दि. २१.१२.२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहे:-

"अपीलकर्त्यास माहितीचे निरीक्षणाकरीता व आवश्यक असलेली माहिती घेण्यास सोमवार दि. २३.१२.२०१९ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत बोलावून माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी यांना सुनावणी दरम्यान देण्यात आले."

जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांनी असे सादर केले की, कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाव्दारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, निशुल्क पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २३.०८.२०१८ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३) अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक : १२.०६.२०२३**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**प्रत :** तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.२) जी/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय, १ ला मजला, धनमिल कंपाऊंड, एन.एम. जोशी मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१३ – विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी या आदेशाची प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोच करावी व त्याची पोच आयोगाला सादर करावी.